**सं.फौ. ख. क्र. ३२०/२०१७**
**मिना वि. मदन**
**निशाणी क्रमांक – ४७ वर पुढे**

**<u>आरोपी तर्फे साक्षदार क्र.२रामकली मदन हिवारे याचा पुढील सरतपास आरोपीतर्फे अधिवक्ता श्री बागडे यांच्यातर्फे</u>**

**५.** मी माझे पुराव्याचे शपथपत्र दाखल केलेले आहे. त्यातील मजकूर मला वकीलांनी वाचून दाखविला त्यानंतर मी त्यावर सही केली आहे. त्यातील मजकूर माझ्या माहितीप्रमाणे खरा व बरोबर आहे. सदर शपथपत्र नि.४७ वर दाखल केलेले आहे.

**६.** मी सदर प्रकरणात यादी निशानी क्र.५२ सोबत दि.दा.क्र.२६/२०१७ अरुण चव्हाण वि. रामकली हिवरे या दाव्याची निशानी क्र.१ ची प्रमाणीत प्रत दाखल केली आहे. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. (सदर दस्तास निशानी देण्यास तक्रारदाराच्या वकीलांकडून हरकत आली की सदर दाव्याची प्रत ही खाजगी दस्त असून त्यास निशानी देता येत नाही. त्यास आर्टीकल देण्यात यावे. यावर आरोपीच्या वकीलांकडुन अशी हरकत घेण्यात आली की, सदर दस्त हा कोर्टातील दस्त असून त्याची प्रमाणीत प्रत न्यायालयात दाखल करण्यात आली असल्याने त्यास निशानी देण्यात यावे. – दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकुण तसेच दस्ताची पाहणी केली असता सदर दस्त दाव्याचे प्रमाणीत प्रत आहे करीता त्यास हरकतीसह निशानी देणे योग्य होईल.) सदर दस्तास हरकतीसह पुढील **निशानी क्र.५४** देण्यात येते.

**<u>उलट तपास फिर्यादीतर्फे अधिवक्ता श्री पी.व्ही. बांते यांच्यातर्फे</u>**

**७.** अरुण चव्हाण यांनी माझ्याविरूध्द दिवाणी दावा दाखल केल्या नंतर मी माझे उत्तर त्या दाव्यात दाखल केलेले आहे. सदर दाव्यात दाखल केलेल्या उत्तराची प्रत मी अभिलेखावर कां दाखल केली नाही याचे कारण सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर दाव्यामध्ये मी चुकीचे उत्तर दिले होते म्हणुन त्याची प्रत मी अभिलेखावर दाखल केली नाही.

**८.** माझे शिक्षण झालेले नाही. हिवराबाजार या गावी मी ५० ते ६० वर्षापासून राहते. मला एक मुलगा दोन मुली आहेत. तिघांचे लग्न झालेली आहेत. हे म्हणणे खरे आहे

की, माझा मुलगा बँक ऑफ इंडीया हिवराबाजार शाखा येथे काही काळ काम करीत होता. हे मला आठवत नाही की, माझ्या मुलाने सदर बँकेत किती वर्षे काम केले होते. आता माझा मुलगा रोजमजुरीला जातो. माझ्या मुलाला बँकेमधुन कां काढले होते हे मला सांगता येणार नाही.

९. हे म्हणणे खरे आहे की, अरुण चव्हाण यांना नोकरी होती व त्यामुळे ते नागपूर येथे राहत होते. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे माझ्या कुटूंबाचे अरुण चव्हाणसोबत काही संबंध नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या मुलीचे लग्न सन २०१२ मध्ये झाले होते हे दाखविण्याकरीता मी अभिलेखावर कोणतेही दस्तावेज दाखल केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, हे मी खोटे सांगत आहे की, सन २०१२ मध्ये मी माझ्या मुलीच्या लग्नाकरीता अरुण चव्हाण याचेकडून १ लाख रूपये घेतले होते. साक्षीदार सांगते दिड लाख रुपये परत वापस दिले होते. हे म्हणणे खरे आहे की, अरुण चव्हाण यांना दिड लाख रुपये परत केले यासंबंधी कोणतेही दस्तावेज अभिलेखावर दाखल केले नाही. साक्षीदार सांगते की, संबंध असल्याने दस्तावेज लिहीले नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, हे मी खोटे सांगत आहे की, सबंध असल्याने दस्तावेज लिहीले नाही. हे म्हणणे खरे नाही की, हे मी खोटे सांगत आहे की, अरुण चव्हाण याला जमानत म्हणून माझ्या पतीने कोरा चेक दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, हे मी खोटे सांगत आहे की, माझ्या पतिने मिना सोनेकर हिला चेक दिला नव्हता.

१०. माझे पती बँकेत काम करत होते. हे म्हणणे खरे आहे की, माझे पती बँकेमध्ये असल्याने त्यांना व्यवहाराची चांगली माहीती होती. नंदा नेवारे, सविता नेवारे व मिना सोनेकर यांना मी ओळखते. साक्षीदार सांगते की, सदर केस दाखल झाल्यापासून मी त्यांना ओळखते पुर्वीपासून ओळखत नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, माझे पती मिना सोनेकर, सविता नेवारे व नंदा नेवारे यांना ओळखतात. हे मला माहीती नाही की, मिना सोनेकर सालई गावाची रहीवासी आहे किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीसोबत माझे व माझ्या कुटूंबाचे चांगले संबंध होते.

११. हे म्हणणे खरे नाही की, सन २०१६ मध्ये आम्ही आमच्या नविन घराचे बांधकाम केले होते. आमचे हिवराबाजार येथे दोन घर आहेत. एक सासू सास–याचे व एक आम्ही बांधले आहे. हे म्हणणे खरे नाही की, आमच्या नविन घराच्या बांधकामासाठी माझ्या पतीने फिर्यादी हिच्याकडून रक्कम रु.१,६०,०००/– उसने घेतले होते. हे म्हणणे खरे

नाही की, सदर रकमेपोटी माझ्या पतीने फिर्यादी हिला चेक दिला होता.

**१२.** हे म्हणणे खरे आहे की, महन्द्रा फॉयनान्स यांचेकडून घर दुरूस्तीकरीता तिन लाख रुपये कर्ज घेतले होते हे दाखविण्याकरीता कोणतेही कागदपत्रे दाखल केले नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर कर्जापोटी भेटलेल्या रकमेमधुन दिड लाख रुपये अरुण चव्हाण यांना परत केले होते हे दाखविण्याकरीता कोणतेही दस्त अभिलेखावर दाखल नाही. हे म्हणणे खरे नाही की, हे मी खोटे सांगत आहेकी, अरुण चव्हाण याला दिलेला कोरा चेक तो त्याने फिर्यादीला दिला होता. हे म्हणणे खरे नाही की, हे मी खोटे सांगत आहे की, अरुण चव्हाण व त्यांचा मित्र वामण सोनेकर यांनी संगनमत करुन वामन सोनेकर याचे पत्नी मिना सोनेकर या नावाने चेक दिला व माझ्या पतीची फसवणूक केली.

**१३.** हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासणीतील परिच्छेद क्र.४ मधील दिवाणी दावा क्र.२६/२०१७ विद्यमान कोर्ट दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर रामटेक येथे न्यायप्रविष्ठ आहे हे वगळता सर्व मजकुर चुकीचा लिहीलेला आहे.

**१४.** हे म्हणणे खरे नाही की, अरुण चव्हाण याने माझ्याविरुध्द माननीय न्यायालयात दावा दाखल केला आहे त्यामुळे मी सदर प्रकरणात फिर्यादीविरुध्द खोटी साक्ष दिली आहे. हे म्हणणे खरे माझ्या शपथपत्रातील संपूर्ण मजकुर चुकीचा व खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,
सही/-
**(श्रीमती. डी. एस. सैंदाणे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
कोर्ट न.२, रामटेक

रामटेक
दिनांक -१५/०२/२०२४.